JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# आदिवासींच्या सामाजिक चळवळी

Adivasinchya Samajik Chalvali

चंद्रभागा शंकर उघडे
संशोधन विद्यार्थिनी
न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
अहमदनगर – ४१४ ००१.

## प्रस्तावना

समाज हा प्रारंभीक अवस्थेमध्ये जास्त स्थितीशील होता. त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता नैसर्गिक सानिध्यात होत असे. त्यासाठी फारसे संघर्ष झालेच नाही आणि संघर्ष झाले तरी त्याचे स्वरूप व्यक्तीगतच होते. नैसर्गिक शक्ती व आपल्याच समुहातील प्रबल व्यक्तीपुढे नमते घेणे हा बहुतांश व्यक्तींचा स्वभावच होता. कालांतराने या परिस्थितीत काही कारणाने बदल होत गेला. मुख्य म्हणजे समाजात प्रखर स्वरूपात विषमता वाढत गेली. त्यातुन समाजातील काही व्यक्तीच्या मनात जाणिव जागृती निर्माण झाली व जीवन कलहाचा भाग म्हणून त्याविरुध्द आवाज उठविला गेला. त्याला समाजातील इतरांचा पाठींबा व प्रतिसाद मिळाला परिणामी हा आवाज व्यापक व बुलंद झाला. या परिस्थितीमुळे समाजात काही बदल घडून यायला लागले त्यासाठी काही गट वा समूह एकत्रित येवून आपल्या अस्तित्वाकरिता हालचाली सुरू केल्या. या हालचालीतून काही सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक आदोलने सुरू झाली. या आंदोलनाला जेव्हा संघटीत स्वरूप प्राप्त झाले. बहुसंख्य लोक सहभागी झाले, अनेक भागात अशीच आंदोलने सुरू झाली. तेव्हा अशा आंदोलनांचे रुपांतर सामाजिक चळवळीत झाल्याचे दिसून येते. ही आंदोलने या चळवळी आदिवासी समाजात प्राचीन काळापासून निर्माण झाल्याचे दिसुन येते.

भारतीय आदिवासी हे स्वभावतःच शांतताप्रिय लोक आहेत. परंपरागत निवास हा डोंगर, दऱ्याखोऱ्यात व जंगलात असल्यामुळे निर्सगाच्या सानिध्यात ते स्वयंपूर्ण आणि समाधानी जीवन जगत आलेले आहेत. आदिवासीच्या गरजा या अत्यल्प असून नैसर्गिक पर्यावरणात उपलब्ध असलेल्या संसाधनाच्या आधारावर ते पिढयानपिढ्या जगत आलेले आहेत. निरागसता आणि प्रामाणिकता तसंच निर्सगप्रम व त्यातून निर्माण झालेला आदर आणि निसर्गपुजा ही त्यांची खास वैषिष्टये होय. बाह्य जगाशी पर्यायाने आधुनिक संस्कृतीशी जोपर्यंत त्यांचा संपर्क नव्हता तोपर्यंत त्यांच्या शांत व संयमी जीवनात कोणतेही आंदोलने किंवा बंड झाले नव्हते. स्थानिक दैनंदिन जीवनातील वाद त्यांच्या जमातीतील परंपरागत पंचायतीच्या माध्यमातून विचार विनिमयाने सोडविले जात असे.

पंचायतीच्या निर्णयाचे सर्वांना पालन करणे बंधनकारक असल्यामुळे स्वागतच असे मात्र बाह्य जगाशी संपर्क आल्यानंतर हे चित्र हळूहळू बदलले. परकिय सत्ता, फिरते व्यापारी, सावकार बाह्य संस्कृतीचे स्वार्थी लोक, शासनाचे कर्मचारी, आदिवासींचे शोषण करणारी माणसे या सर्वांच्या परिणामामुळे आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनात परिवर्तन व शोषणाचे पर्व सुरू झाले. यातुनच आदिवासी समाजात सामाजिक चळवळीची बिजे रोवली जाऊन बहुसंख्य चळवळी निर्माण झाल्या. या चळवळी का निर्माण झाल्या? त्यांचे काय परिणाम झाले. आदिवासी जीवनावर या चळवळींचा काय प्रभाव पडला यांचा अभ्यास करण्यासाठी 'आदिवासींच्या सामाजिक चळवळींचे विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन कार्यास एक विशिष्ट दिशा देण्याकरिता संशोधन कार्याचे उद्देश निश्चित करून त्यानुसार शोध कार्य करुण वास्तविकतेचा शोध घेण्यास साहाय्य प्राप्त करते म्हणून शोध निबंधाचे प्रमुख उद्देश निर्धारित करणे आवश्यक असते. ती पुढीलप्रमाणे :

## शोधनिबंधाचे उद्देश

१. सामाजिक चळवळीचा अर्थ स्पष्ट करणे.

२. आदिवासी सामाजिक चळवळीच्या निर्मितीचा उद्देश्य अभ्यासणे.

३ . आदिवासींच्या सामाजिक जीवनात सामाजिक चळवळीचे महत्व विशद करणे.

४. आदिवासींच्या सामाजिक चळवळीच्या कार्याचा व परिणाचा अभ्यास करणे.

५. भारतातील काही प्रमुख आदिवासीच्या सामाजिक चळवळीचा यश अपयशाचा अभ्यास करणे.

**अध्ययन पद्धत :**

तथ्य संकलन व सत्यापनासाठी सामाजिक शास्त्रात विविध पद्धती वापरण्यात येतात प्रसिद्ध विचारवंत बर्नार्ड यांनी व्याख्या करताना म्हटले की, शास्त्राची व्याख्या मुख्यत्वे सहा प्रक्रीयांच्या रुपात केली जाते. या प्रक्रीया म्हणजे परिक्षण, सत्यापन व्याख्या, वर्गीकरण, संघटन आणि निर्धारण होत. ज्यामध्ये भविष्यकथन आणि प्रयोग यांचा समोवश होतो या आधारावर संग्रहीत केलेल्या ज्ञानास शास्त्र असे म्हणतात. सदर शोध निबंधात अन्वेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला असून तथ्य संकलनाकरिता दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ज्यामध्ये सरकारी दस्तऐवज संदर्भ पुस्तके, मासिक, वर्तमानपत्रे इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला. सदर शोधनिबंधात वैज्ञानिक पध्दतीचा वापर करून पूर्णता शास्त्रीयता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक चळवळीचा अर्थ**

सामाजिक चळवळीच्या अर्थाबाबत विविध विचारवंतांमध्ये मतभेद असल्याचे दिसुन येते. तरीसुध्दा १९५० ला काही विचारवतांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात विलकिंसन्स यांचे नाव घ्यावे लागेल. विलकिंसन्स यांच्याशिवाय अनेक विचारवतांनी अर्थ माडण्याचा प्रयत्न केला आहे तो पुढीलप्रमाणे

१. हर्बट ब्लूमर यांच्या मते, सामाजिक चळवळ हा असा एक सामूहिक प्रयत्न आहे की ज्यातून जीवनाची नवीन व्यवस्था निर्माण होते.

२. सी. डब्लू किंग यांच्या मते सामाजिक चळवळ ही एक अशी प्रक्रिया होय की, जिचा उद्देश्य, विचार व्यवहार आणि सामाजिक संबंधात परिवर्तन आणणे हा असतो.
३. लँग आणि लेंग यांच्या मते सामाजिक चळवळ ही एक अशी प्रक्रिया होय की, जिचा उद्देश्य सामाजिक व्यवस्थेतील मूलभूत स्वरूपावर प्रभाव टाकणे आणि त्यास नवे स्वरूप प्रधान करणे हा असतो.

वरील व्याख्येवरून असे लक्षात येते की, सामाजिक चळवळ ही एक प्रक्रिया असून जिचा उद्देश्य विचार व्यवहार आणि सामाजिक संबंधात आणि सामाजिक व्यवस्थेत अमुलाग्र परिवर्तन आणणे हा असतो, याकरिता बहुसंख्य लोक अविरत प्रयत्न करीत असतात, तेव्हा तिला सामाजिक चळवळ असे म्हणतात:

## आदिवासी समाजातील काही प्रमुख सामाजिक चळवळी

### १. झारखंड चळवळ

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतातील सर्वच आदिवासी जमातीत विकासाच्या भावना निर्माण झाल्या होत्या. अश्याच भावना सद्यस्थितीत झारखंड स्थित आदिवासी जमातीच्या मनातही निर्माण होवून काही मागण्याही केल्या. परंतु त्यांचा भ्रमनिराश झाला परिणामी इ.स. १९५० मध्ये जमशेदपुर अधिवेशनात जसपाल सिंग यांच्या नेतृत्वात झारखंड पार्टीची स्थापना झाली. परंतु नंतरच्या काळात जसपाल सिंह व ´हो' जमातीचे नेते मुंबई हे काँग्रेस पाटीत गेले, त्यामुळे 'होरी' हेच झारखंड पार्टीत राहीले नंतरच्या काळात आदिवासींची भूमी बळकावणाऱ्या व शोषण करणाऱ्या सावकार व महाजन यांच्या विरोधात आंदोलन उभे करून १९६८ बिरसा सेवा दलाने स्वतंत्र झारखंड राज्याची मागणी केली. १९७३ मध्ये शिबू सोरेन यांनी झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना करून या आंदोलनाला तीव्र केले. याच काळात झारखंड को ऑडिनेशन कमेटीची स्थापना श्री. कैलरी यांच्या नेतृत्वात झाली. त्याला कम्युनिस्ट नक्षलवादी व इतर सर्वांचाच पाठींबा मिळाला. हे आंदोलन पुढील उद्देशाने सुरू करण्यात आले होते.

१. भूमी व जंगलांच्या बाबतीत निष्कासित झाल्याबाबत
२. रोजगार आणि प्रशिक्षणापासून वंचित
३. सांस्कृतिक समीश्रण

४. असंतुलित विकास

आदिवासींचे शोषण करणाऱ्यांना आदिवासी प्रदेशातून बाहेर घालविणे हा प्रमुख उद्देश्य होता. त्यासाठी स्वतंत्र राज्याचा दर्जा मागितला गेला, नंतरच्या काळात झारखंड राज्याची स्थापना झाली. याचा या प्रदेशात राहणाऱ्या मुंडा, संथाल व गोंड यांना अनेक फायदे होतील अशा अपेक्षा होत्या परंतु ते शक्य झाले नाही. याचे कारण समाजशास्त्रज्ञाने दिशाहीन नेतृत्वाला दिले आहे.

## २. बोड़ो आंदोलन

इ.स. पूर्वी ५००० वर्ष बोड़ा म्हणजेच 'कछाटी' लोक मध्य आशियातुन ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यात आले. १३ व्या शतकात 'अहोम' लोकांनी त्यांना या क्षेत्रातून हुसकावून लावले नंतर बोडो आदिवासींनी कच्छच्या पहाडावर आपले राज्य स्थापीत केले व त्याची राजधानी गुहावटी ही होती. आजची बोडोलैंडची जी मागणी आहे जी ब्रिटीश कालखंडात केली गेली होती, यासाठी बोडी परिषदेची स्थापना करण्यात आली होती. आसामात २ कोटी ६५ लाख विभिन्न आदिवासी जमातीचे लोक राहतात. त्यापैकी ४२ लाख ९६ हजार केवळ बोडो आदिवासी आहेत. त्यामुळे या क्षेत्राला स्वायत्तता द्यावी अशी मागणी या आंदोलनाची होती. त्यासाठी जाळपोळ, रास्ता रोको, रेल रोको अशा हिंसात्मक मार्गांचाही स्विकार केला गेला. करो या मरो असा नारा देत उपेन्द्रनाथ ब्रम्हा यांनी नेतृत्व केले. या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत या मागण्यासाठी बोडी परिषदेची स्थापना करण्यात आली.

१ ब्रम्हपुत्रेच्या वरील किनाऱ्यापलिकडे राहणाऱ्या आदिवासीचे स्वतंत्र राज्य

२ ब्रम्हपुरच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या आदिवासी जिल्हाना स्वायत्तता

३. कारवी, एकलांगच्या बोड़ों कछाटी वंशाच्या मैदानी आदिवासींना सातव्या अनुसूचित टाकणे.

## ३. संथालांची चळवळ

जंगलात शेती स्थायी वस्ती करून राहणाऱ्या आदिवासींना जमिनीवरून हटविण्याचे अधिकार ब्रिटीशांनी सावकाराला दिल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली. जी भूमी आदिवासींची आहे, ती सावकाराला. या विरोधात ही चळवळ होती

या चळवळीला छोटा नागापूर भागातील सावकारांकडून होणाऱ्या अन्याय व अत्याचाराची पार्श्वभूमी होती. संथाल लोक हे फिरती शेती करणारे लोक होते. ब्रिटीशांनी जंगलांचा बंदोबस्त केल्यामुळे ते शेतीपासून वंचित झाले. त्याचबरोबर काही संथालांना वेठबिगार म्हणून सावकार, ठेकेदार व इंग्रज अधिकारी यांच्याकडे काम करावे लागत होते, परिणामी त्याचे आर्थिक शोषण केले जात. म्हणून १८५५ मध्ये रोजी भगवानवाडी गावात १० हजार आदिवासी संघटीत होवून या व्यवस्थेविरुध्द आंदोलन उभे करून विद्रोह केला. नंतरच्या काळात जगायचे असेल तर मरायला शिका अशा घोषणा देत अनेक ठीकाणी विद्रोह घडून आणले. याचाच परिणाम होवून अनेक आदिवासींना आपल्या जमीनी परत मिळाल्या.

## ४. शेतकरी व आदिवासींची संयुक्त चळवळ

राजस्थानमधील मेवाड भागातील शेतकरी व आदिवासींचे जहागीरदारांकडून शोषण होत होते. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करून जास्त कर वसूल करीत होते, म्हणून श्री. तेजावत यांनी भिल्ल आदिवासींना एकत्रित करून एकी आंदोलन नावाची चळवळ उभी केली. या चळवळीच्या वेठबिगारी बंद करणे व अवाजवी कर रद्द करणे अशा दोन मागण्या होत्या. या काळात वन वापरावर कर, मिठाच्या भावत वाढ, दारू पिण्यावर बंदी, परंपरागत पंचायतीचे अधिकार समाप्त, शिकारीवर बंदी असे अनेक निर्बंध आदिवासींवर लादण्यात आले होते. यातून आदिवासींच्या मनात असंतोष उफाळून आला. परिणामी हिंसाचारी परिस्थिती निर्माण झाली. तिला नियंत्रित करण्यासाठी ६ मे १९२२ रोजी सिरोही तालुक्यातील बालोलिया व भूला या गावात गोळीबार केला. जाळपोळ झाली. त्यात अनेक आदिवासी बेघर झाले. मृत पावले. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी अनेक प्रयत्न केले परंतु त्यांना यश प्राप्त झाले नाही. शेवटी त्यांना आदिवासीशी करार करावा लागला व त्यात पुढील गोष्टी मान्य करण्यात आल्या.

१. अधिकाऱ्यांनी भिल्ल व गरासियांशी सन्मानपूर्वक वर्तन ठेवावे.
२. कर आणि शेतसारा यात सुट देण्यात यावी.
३. दसरानिमित्त लागत म्हणून एक बकरा प्रत्येक गावातुन घेण्यात यावा.
४. बिजाईवरील कर समाप्त करावा.
५. आदिवासी वेठबिगारीची कामे करणार नाही.
६. आदिवासींच्या परंपरागत पंचायतीना पुन्हा अधिकार प्राप्त होतील.

एकुणच ही चळवळ सर्वच दृष्टीने इतिहासात एक वेगळा आयाम दर्शविणारी ठरली.

**५. देवी चळवळ**

१९२० मध्ये महाराष्ट्रात व गुजरातमध्ये स्त्रियांच्या अंगात देवी येते व ही देवी आदिवासींनी मांसाहार करू नये व दारू पिऊ नये, असे सांगते. परिणामी या आदिवासींनी पारसी लोकांच्या घरी काम करायला नकार दिला. यातून तणाव निर्माण झाला. हा तणाव निर्माण झाला तरीही सकारात्मक चळवळच म्हणावे लागेल, कारण ही अंधश्रध्दा जरी असली तरी सामाजिक हिताचीच होती.

**६. भगत चळवळ**

सुधारणावादी चळवळीत गोविंद गिरी यांच भगत आंदोलन विसाव्या शतकातील एक महत्वाचे आंदोलन होय. धर्म परिवर्तन थांबविणे हा एक हा त्याचा उद्देश्य होता. त्याकरिता त्यांनी ख्रिश्चन मिशनरी विरुद्ध आवाज उठविला. त्यांनी ‘भिल्ल राज’ ची स्थापना केली. भिल्लांनी शेती करावी. सिंचन करावे, पुरुषानी दागदागीने घालू नये, मुर्तीपूजेला विरोध, हिंसाचारात विरोध व्यभिचार न करणे यांचा प्रचार केला. त्याचा भिल्लावर फार प्रभाव पडला. परिणामी महाराष्ट्रात अनेक भागात अशा वेगवेगळ्या नावाने चळवळी निर्माण झाल्या.

**७. वेठबिगारी विरुध्द चळवळ**

१९४५ मध्ये गोदावरी परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली वेठबिगारी आणि कमी मजुरी देण्याविरुध्द आंदोलन करण्यासाठी किसान सभेची स्थापना केली. परिणामी वारली जमातीच्या अनेक लोकांनी मालकाकडे काम करणे बंद केले पोलीसानी त्यांच्या विरुध्द केसेस भरल्या. शेवटी आदिवासी लोकांनी शस्त्र उचलून पोलीसांवर छुपे हल्ले करण्यास सुरवात केली.

**८. शैक्षणिक चळवळी**

आदिवासी भागात शिक्षणाची सोय उपलब्ध नाही, म्हणून ताराबाई मोडक यांनी शैक्षणिक चळवळ सुरू करून आदिवासी समाजात शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. तसेच अनुताई वाघ यांनी सुध्दा महात्मा गांधी यांच्या ग्रामशिक्षण योजनेत काम केले बालवाड्या, अंगणवाडी, वस्तीगृहे, प्रौढ शिक्षणवर्ग व्यवसायिक

शिक्षण व्यवस्था इत्यादीची व्यवस्था करून शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य या चळवळींनी केले.

## ९. पर्यावरण जतनासाठी चळवळी

नैसर्गिक पर्यावरणाच्या जतनाचे कार्य आदिवासी लोक आदि काळापासुन पिढ्यानपिढ्या करीत आले. आहेत. मात्र बाह्य संस्कृतीच्या तथाकथीत विकासाच्या कार्यक्रमामध्ये पर्यावरणाची नासधूस आणि गैरवापर मोठ्या प्रमाणात होतो. त्याविरुध्द काही पर्यावरणवाद्यांनी आवाजही उठविला. माधव गाडगीळ यांनी दक्षिणेत सायलेंट व्हॅली या चळवळीने मोठ्या धरणाविरुध्द आवाज उठविला. श्री. सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वात जंगलातील वृक्षतोड थांबविण्यासाठी ´चिपको आंदोलन' नावाने चळवळ सुरू केली. या चळवळीचा उद्देश पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि आदिवासींचे घर असलेले जंगल टिकविणे हा होता.

## १०. सावकाराविरुध्दच्या चळवळी

जंगलात तसेच पर्वत प्रदेशात राहणारे आदिवासी समाधानी, प्रामाणिक व शोषणमुक्त जीवन जगत होते. परंतु सभ्य समाजातील लोक, सावकार, व्यापरी यांचा सर्पक वाढल्यामुळे शोषणाला सुरुवात झाली. परिणामी वेठबिगारी, कर्जबाजारीपणा वाढला. ही बाब आदिवासी लोकांच्या लक्षात येताच याविरुध्द आवाज उठवायला सुरुवात केली. १८०४ मध्ये सर्वप्रथम होनाजी भागोजी केंगले सावकाराविरुध्दचे बंड पुकारले. १८७६ मध्ये ते कर्जत जवळील नांदगाव येथे पकडले गेले. त्याच्यावर बंडखोरीचा गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा दिली. याचाच परिणाम होवून संपूर्ण जादिवासी जागृत झाले. १८८९ च्या सुमारास अशा तीन चळवळी निर्माण झाल्या. पुरंदर येथील श्री वासुदेव बळवंत फडके यांच्या नेतृत्वात चळवळ उभी झाली. सातारा जिल्हयातील रामोशी लोकांच्या बंडाचे नेतृत्व उमाजी नाईक यांनी तर महादेव कोळी यांच्या चळवळीचे नेतृत्व कृष्णा सावने व नंतर रामा किरवा यांनी केले. रामा किरवा सावकाराचे नाक कापत व त्यांच्या दप्तराची होळी करत असत. परिणामी कॅप्टन ल्युकिन यांच्या नेतृत्वात पोलीसांच्या तीन तुकड्यांनी आक्रमण केले. रामा किरवा कडील दारूगोळा संपल्यामुळे तो पकडला गेला व त्याला बंडखोर घोषीत करून फाशी दिली. अशा घटनांचा परिणाम होवून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नेतृत्वात सावकाराविरुध्दच्या

चळवळी निर्माण होतच गेल्या. परिणामी सावकाराचे जाच काही प्रमाणात कमी व्हायला लागले, या चळवळीचे पुढील तीन परिणाम घडून आले.

१. या चळवळीमुळे इंग्रजाचे लक्ष आदिवासींकडे केंद्रीत झाले आणि त्यांना विशेष सोयी, सवलती देण्याचा विचार सुरु झाला.

२. सावकाराचे व्याजाचे दर कमी झाले व सावकारी कारवायावर इंग्रजाचे लक्ष केंद्रीत झाले.

३ जंगलांसंबंधी कर्मचारी वर्ग व कायद्यात शिथीलता यायला लागली.

## ११. आरोग्यविषयक चळवळ

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या आरोग्यविषयक चळवळीमध्ये हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकलपातील डॉ. प्रकाश आमटे व मंदा आमटे यांना मानाचे स्थान आहे त्यांनी १९७४-७५ पासून देवीदेवता, अंगाराधुपारा, जादूटोणा अंधश्रद्धा यांपासून दूर करून आदिवासीत परिवर्तन घडवून आणले आणि आधुनिक औषधोपचारावर विश्वास बसवून या चळवळीला कार्यात्मक यश मिळवून दिले. अश्याच आरोग्यविषयक चळवळी डॉ. सतिश गोगुलवार व सौ. शुभदा यांनी तर अमरावती जिल्हयातील मेळघाट भागात डॉ. राजेंद्र पहलवार यांनीही चळवळ उभी केली.

## १२. आमच्या गावात आमचे राज्य

१९८५ मध्ये गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील लेखा मेंडा या माडीया गोंड बहुल आदिवासींच्या अन्याय मुक्तीकरिता व विकास कामाकरिता देवाजी तोफा यांच्या नेतृत्वात आंदोलन उभे करण्यात आले. जंगल, जमीन आणि उत्पादनावर आदिवासींचा हक्क मान्य करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात सर्व हक्क अधिकाऱ्यांच्या हातात होते. म्हणून मावा नाटे मावा राज ही चळवळ निर्माण करण्यात आली असून तीचा उद्देश्य हे सर्व अधिकार ग्रामसभेला असावेत हा होता. यात या चळवळीला बऱ्याच अंशी यश प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे भारतातील संपूर्ण आदिवासी भागात वेगवेगळ्या नावाने वेगवेगळ्या आदिवासी चळवळी निर्माण झाल्या. त्यापैकी काही आदिवासी चळवळींचा उद्देश, त्यांचे परिणाम व यश आणि अपयश यांचा आढावा वरीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

## समारोप

एकंदरीत आदिवासी चळवळी निर्माण होण्यामागची परिस्थिती लक्षात घेतल्यास स्पष्ट होते की, जास्तीत जास्त चळवळी या त्यांचे आर्थिक शोषण, बाह्य संस्कृतीने केलेले त्याच्या निवासावरील व जंगलावरील आक्रमण, पर्यावरणाचे असंतुलन, वृक्षतोड, आदिवासीचे विस्थापन यांच्या विरोधातच होत्या. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार, ठेकेदार व जमीनदार यांनी आर्थिक शोषण करून जमीनी हडपल्या. तसेच शासनाचे कर्मचारी जसे पटवारी, वनरक्षक, पोलीस यांनीही आदिवासींच्या अज्ञान व दुर्बलतेचा फायदा घेतला. यातून आदिवासीत असंतोष निर्माण होवून अशा सुधारणावादी, परिवर्तनशील, क्रांतीकारी, काही शांतीप्रिय तर काही हिंसात्मक व संघटनात्मक चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीला काही यश व अपयश आल्याचे दिसून येते.

## संदर्भ :


१. संगवे वि. , आदिवासींचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९७२.
२. देवगावकर डॉ. एस. जी., सामाजिक चळवळी परंपरागत आणि नविन, साईनाथ प्रकाशन धरमपेठ, नागपूर.
३. शहा घनश्याम, (अनुवाद - वेंगुर्लेकर), सामाजिक चळवळी आणि सरकार डायमंड पब्लिकेशन, पुणे.
४. शहा घनश्याम (अनुवाद - चिकटे प्राची) भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
५. आगलावे डॉ. प्रदिप, आदिवासीचे समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपुर.
६. कन्हाडे डॉ. बी. एम., आदिवासी समाजाचे समाजशास्त्र पिंपळपुरे अँड पब्लिशर्स, नागपूर.
७. निकम प्रा. गौतम, आदिवासींच्या समस्या : एक अभ्यास, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगाव.
८. आकरे डॉ. बी. एन., आदिवासीची ओळख. पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर.

९. देवगावकर डॉ. एस. जी., महाराष्ट्रातील जाती जमाती, साईनाथ प्रकाशन, प्रथमावृत्ती : २००९, धरमपेठ, नागपूर.